SKF

DG:stkex/325 & 326
4th April, 2019

BSELISTING NEAPS

The Secretary **BSE Limited,** Phiroze Jeejeebhoy Towers, Dalal Street, Mumbai 400 001.	The Manager, Listing Department **National Stock Exchange of India Limited** 'Exchange Plaza', C-1, Block G, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai 400 051

Dear Sir,

Sub : Reminder Letter to shareholders – Transfer of Equity Shares and Unpaid Dividend of the Company to Investor Education and Protection Fund (IEPF) Authority

Pursuant to Regulation 30 read with Schedule III Part A Para A of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements), Regulations, 2015, we enclose the following documents :

1. Copy of reminder letter to shareholders dated 15th March, 2019
2. Copies of newspaper advertisement published in Business Standard, Mumbai, Pune & Bangalore editions and Ahpla Mahanagar, Mumbai edition dated 16th March, 2019.

The above reminder letters were sent to the shareholders who have not claimed their dividends for seven or more consecutive years and whose shares are liable for transfer to the IEPF Demat Account as per Section 124(6) of the Companies Act, 2013 read with the Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules, 2016 notified by the Ministry of Corporate Affairs and subsequent amendment from time to time.

This is for your information and records

Thanking you,

Yours faithfully,
SKF India Limited

Pradeep Bhandari
Company Secretary

Encl : a/a.

TSR DARASHAW LIMITED

TSR DARASHAW
Total Solutions Repository

(Unit : SKF India Limited)
6-10, Haji Moosa Patrawala Ind. Est., 20 Dr. E. Moses Road, Near Famous Studio, Mahalaxmi, Mumbai 400 011.
Tel 91 22 6656 8484 • Fax 91 22 6656 8494 • Email csg-unit@tsrdarashaw.com • Website www.tsrdarashaw.com
CIN:U67120MH1985PLC037369 • Business Hours : 10.00 a.m. to 3.00 p.m. (excluding Bank Holidays)

E
03

Date : 15th March, 2019

URGENT

Dear Sir/Madam,

We wish to inform you that pursuant to the provisions of Sections 124, 125 and other applicable provisions of the Companies Act, 2013, the dividend amount(s) remaining unpaid or unclaimed for the period of seven years from the date of transfer to the Unpaid Dividend Account will be transferred by SKF India Limited ("the Company") to the Investor Education and Protection Fund (IEPF) established by the Central Government.

Our records indicate that you have not claimed your dividend and the amount(s) are lying unpaid/unclaimed against your folio/demat account, the details of which are given overleaf. **You are therefore requested to claim the unclaimed amount(s) by returning the duly signed tear-off portion alongwith your original cancelled cheque leaf with your name printed thereon as the account holder at the earliest, but not later than the last date indicated overleaf, to enable us to make the payment.**

If the name of the first holder is not printed on the cheque leaf, you are requested to submit a Bank attested copy of the first page of your Bank Pass Book/Statement of Account in original alongwith a cancelled cheque leaf in original. **It is to be noted that issue of payments without bank details is disallowed.**

In case your dividend amount is outstanding for 7 consecutive years and is unclaimed, the corresponding shares will also be transferred to IEPF as per the Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules 2016 as amended from time to time.

Members whose unclaimed amounts are transferred to IEPF can apply for refund by making an application to the IEPF Authority in Form IEPF-5 available on the website of the IEPF Authority at www.iepf.gov.in. Members can file only one consolidated claim in the financial year as per the said rules.

Assuring you of our best services.

Yours faithfully,
for **TSR DARASHAW LIMITED**
Investor Services Section

✂ - - - - - - - - - - PLEASE TEAR HERE - - - - - - - - - -

To,
TSR DARASHAW LIMITED
(Unit : SKF India Limited)
6-10 Haji Moosa Patrawala Ind. Estate 20 Dr. E. Moses Road, Near Famous Studio, Mahalaxmi, Mumbai - 400 011

Dear Sir/Madam,

Sub. : Payment of Unpaid / Unclaimed Amount(s)

This has reference to your letter dated 15th March, 2019. Kindly arrange for payment of unpaid / unclaimed amount(s) as mentioned overleaf on the basis of this advice.

(Tick ✓ whichever is applicable)

☐ I enclose the original instrument(s) as per the particulars given overleaf, kindly arrange for payment thereof.

☐ I do not possess the original instrument(s).

I confirm that I have not encashed the instrument(s) sent to me earlier nor have I received any money in connection with the payment(s) mentioned overleaf.

I request you to update my Bank Details against the overleaf folio and accordingly, I am enclosing :

For Shareholders holding shares in physical form (where bank details are to be updated) :

☐ Original Cancelled cheque leaf bearing the name of the first shareholder

OR

☐ Bank attested copy of first page of the Bank Passbook/Statement of Account and a cancelled cheque leaf in original.

Signature of first holder

narrowed in on concealed financial transactions in the Kashmir Valley on Friday.

This assumes significance in the run up to the Lok Sabha polls, especially after the Pulwama terror attack.

While one operation was against a "prominent" trader who "apparently used" proxies to conduct large cross-LOC trade, the other was against a property dealer, who allegedly facilitated cash for undesirable activities.

The department seized undisclosed cash worth Rs1.44 crore and unaccounted jewellery of ₹2.48 crore from five locations in the Valley. The evidence collected points to undisclosed property transactions of more than ₹41 crore, and concealed financial transactions of nearly ₹17 crore, the Central Board of Direct Taxes (CBDT) said in a press release.

"These actions are part of the department's continued drive against use of black money by disruptive elements in the state (J&K). The operations also send a message of deterrence and obviation to those intending to vitiate the democratic process of free and fair elections," it said.

In the first case, the CBDT found documents of transactions in the names of proxies. With regard to the second person, tax was evaded in a property transaction of above ₹4 crore.

BS REPORTER

US manufacturing output falls in Feb as economy loses momentum

REUTERS
Washington, 15 March

US manufacturing output fell for a second straight month in February and factory activity in New York state was weaker than expected this month, offering further evidence of a sharp slowdown in economic growth early in the first quarter.

The reports on Friday extended the streak of weak economic data and underscored the Federal Reserve's "patient" stance toward further interest rate increases this year. Fed officials are scheduled to meet next Tuesday and Wednesday to assess the economy and deliberate on the future course of monetary policy. The U.S. central bank raised rates four times last year.

The Fed said manufacturing production dropped 0.4 percent last month, held down by declines in the output of motor vehicles, machinery and furniture. Data for January was revised up to show output at factories falling 0.5 percent instead of slumping 0.9 percent as previously reported.

Economists polled by *Reuters* had forecast manufacturing output rising 0.3 percent in February.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील पुलाचा स्लॅब कोसळून झालेल्या दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्या मृतात्म्यांस भावपूर्ण आदरांजली! या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर उद्याचा नियोजित 'शिवराय संचलन' कार्यक्रम रद्द करण्यात आलेला आहे.

- गजानन कीर्तिकर, नेते, शिवसेना

थोडक्यात

विद्यार्थ्यांना मोफत पासचे वाटप

रोहे । तालुक्यातील म्हसाडी गावातील कुणबी समाज विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत एसटी पासचे वाटप करण्यात आले. १९९२ पासून अतिशय दुर्गम व आदिवासी भागात ही शाळा सुरू असून, येथे वांगणी बुद्रुक, दिवी ठाकूरवाडी, ताम्हणशेत बुद्रुक, सवाने, कारिवणे, गोळवाडी येथून विद्यार्थी येणे, तसेच पायी प्रवास करतात. सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे सदस्य हाजी कोठारी यांनी या शाळेतील विद्यार्थ्यांच्या अडचणींचा पाढा 'सुराज्य'च्या चर्चासत्रात मांडला होता. त्यानंतर विनोद वाकडे यांनी वाढदिवसानिमित्त पुढाकार घेऊन त्यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील २७ आर्थिकदृष्ट्या मागास व गरजू विद्यार्थ्यांना एक महिन्याचा एसटी बसचा मोफत पास काढून देण्यात आला. यावेळी शिक्षक म्हात्रे, जाधव, 'सुराज्य'च्यावतीने वाकडे, कोठारी यांच्यासह रोशन चाफेकर, अभिजीत भोसले उपस्थित होते.

पैशांच्या वादातून मारहाण

कल्याण ›› कल्याण पश्चिमेतील वेतुरक पाडा परिसरात राहणारे विजयकुमार रजक यांनी दोन वर्षांपूर्वी अमरनाथ रजक यांना उसने पैसे दिले होते. मात्र विजयकुमारने अमरनाथकडे उसने घेतलेल्या पैशाची मागणी केली असता, संतापलेल्या अमरनाथ व त्यांची पत्नी फोटूदेवी या दोघांनी विजय व त्यांच्या पत्नीला मारहाण केली. दोघेही पती पत्नी जखमी झाले असून आरोपी दोघांविरोधात महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एकाच घरातील ५ मोबाईल लंपास

उल्हासनगर ›› रात्रीच्या सुमारास एका घरात घुसून चोरट्याने ५ मोबाईल लंपास केले. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उल्हासनगर एक येथील [illegible] दिलीप [illegible] यांच्या घरातून ५,००० रुपये किमतीचे ५ मोबाईल लंपास केले. [illegible] पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला.

मोफत वैद्यकीय तपासणी

[illegible]

दोन कंटेनरचे अपघात

पनवेल ›› तळोजा एमआयडीसीच्या परिसरातील रस्त्यावर भले मोठे लोखंडी कंटेनर रस्त्यावरच पलटी होण्याच्या दोन घटना या आठवड्यामध्ये घडल्या आहेत. एक घटनेत फॅक्टरी मार्गी तळोजा एमआयडीसी-कल्याण रस्त्यावर आय.डी.पी.एल कंपनी परिसरात इंडिया ग्लास कंपनीसमोर एक मोठा कंटेनर नुकसान उलटला. तर दोन दिवसांपूर्वी नावडे फाटा येथील रस्त्याच्या मधोमध एक लोखंडी कंटेनर उलटला होता. या दोन्ही घटनेत सुदैवाने जिवित हानी झाली नाही. अपघातांच्या वाढत्या घटनांमुळे या परिसरातील काम करत असलेल्या कामगारांना, मोटरसायकल वाहन चालकांच्या, नावडा फाटा येथील असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना धोका आहे.

मतदार याद्यांमध्ये गोंधळ कायम

नवी मुंबई ›› प्रतिनिधी
connect@mymahanagar.com

लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजला असता उमेदवार प्रचार यंत्रणेची रणनीती आखण्यात व्यग्र झाले आहेत. त्यावेळी मतदारांच्या मतदार यंत्रणेतील गैरप्रकाराकडे सर्वांचे दुर्लक्ष झाल्याने मतदार याद्यांमधील घोळ चव्हाट्यावर आला आहे. याद्यांमध्ये छापील नावात अनेक त्रुटी असल्याने मतदारांना स्वतःचे नाव ओळखण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागत आहे. तर व्यक्तीचे व दुबार नोंदणी असलेली नावे वगळण्याचे अर्ज प्राप्त होऊनही ती वगळली जात नसल्याने यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

लवकरच विधानसभा व महापालिका निवडणुका होणार आहेत, त्यामुळे मतदानासाठी सज्ज होण्याची तयारी मतदारांकडून सुरू आहे. तर निवडणूक विभागाकडून देखील नव्या मतदार नोंदणीसाठी आवाहन केले जात आहे. मात्र, वर्षानुवर्षे मतदार याद्यांमध्ये होत असलेल्या चुकांचा फटका नव्या तसेच जुन्या मतदारांना बसत आहे. मतदार याद्यांमधील नावासह पत्त्यामध्ये अनेक त्रुटी आढळत असून त्या सुधारण्यासाठी मतदारांकडून निवडणूक विभागाकडे तक्रार अर्जांचा पाऊस पाडला जात आहे. त्यानंतरही याद्यांमधील त्रुटी सुधारण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. ऑनलाईन

अर्ज व कागदपत्रे अपलोड केल्यानंतरही तीच कागदपत्रे प्रत्यक्षात जमा करण्यासाठी निवडणूक विभागाच्या कार्यालयात बोलवले जात आहे. परंतु एकदा कागदपत्रे जमा करूनही अर्जांची प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने नागरिकांची नाव नोंदणीसह दुरुस्तीसाठी पायपीट होतच आहे.

यानंतरही एखाद्याच्या नावाची नोंदणी झाल्यास छापील यादीतील त्रुटींमुळे त्यांना स्वतःचे नाव ओळखण्यासाठी कौशल्य पणाला लावावे लागत आहे. काही कुटुंबातील व्यक्तींची नावे वेगवेगळ्या यादीत विभागली गेली आहेत. यामुळे त्यांचे मतदानाचे केंद्रही बदलले गेले आहेत. मात्र, अर्ज भरून देताना त्यामध्ये रहिवासी सोसायटीचे नाव व पत्ता योग्यरीत्या लिहिलेला असतानाही, नाव नोंदणीवेळी मतदार यादीत तो बदलतो कसा, असा प्रश्न मतदारांना वर्षानुवर्षे पडत आहे. ओळखपत्रातील चुकांमुळे त्याचा वापर करताना समस्या अधिक वाढवण्यासारखे ठरत आहे. मतदारांकडून अर्ज भरताना पुरेपूर खबरदारी घेतली जात असतानाही मतदानयादीत नावाचा समावेश होताना त्यांचे पत्ते बदलल्याचा प्रकार पाहायला मिळतो. या मागच्या नेमक्या कारणांबाबत मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र, अशा त्रुटींमुळे एकाच कुटुंबातील व्यक्ती कागदोपत्री विभागली जात असून, शासकीय प्रक्रिये वेळी संबंधिताला त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

मतदार याद्या दुरुस्तच

उप जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना विश्वास

वार्ताहर ›› पनवेल
connect@mymahanagar.com

जिल्हा प्रशासनाने मतदारांच्या मतदार यादीसंदर्भात आवश्यक त्या दुरुस्त्या व इतर बदल केले असून बिनचूक व परिपूर्ण यादी तयार केली आहे. अशी माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने यांनी दिली. मतदारांनी कोणत्याही प्रकारे संभ्रम ठेवू नये, तसेच मार्गदर्शनासाठी हेल्प लाईन, निवडणूक आयोगाने संकेतस्थळ व संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांच्याशी संपर्कात राहावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

मतदार फोटो ओळखपत्रांचे काम जवळ जवळ पूर्ण झाले असून २२ हजार ५३१ दुबार नोंदणी मतदार वगळले आहेत. एवढेच नाहे तर ६५ हजार १०७ जणांच्या दुरुस्त्या झाल्या असून २३ हजार १३६ मृत मतदारांची नावे वगळली आहेत. जिल्ह्यात २६९३ मतदान केंद्रे असून सर्व ठिकाणी सुविधा पुरविण्यात येत असून त्यात दिव्यांग मतदारांबाबी प्राधान्याने विचार केला आहे.

जिल्ह्यात १ जानेवारी २०१९ च्या अंतिम यादीनुसार एकंदर २२ लाख २५१ मतदार असून ११ लाख १९ हजार ७४३ पुरुष व १० लाख ८० हजार ५१३ महिला, आणि ३ तृतीय पंथी मतदार आहेत.

ग्रामपंचायत निवडणुकीत उमेदवारांचे अर्ज मागे

वार्ताहर ›› पनवेल
connect@mymahanagar.com

तालुक्यात चिपळे, कुंडेवहाळ व कर्नाळा या ३ ग्रामपंचायत साठी २४ मार्च रोजी मतदान पार पडत असून अर्ज मागे घेण्याच्या दिवशी चिपळे ग्रामपंचायतमधून ४४ अर्ज मागे घेण्यात आले. २ अर्ज अवैध ठरले. तर एकूण ९ जणांनी सदस्य पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. मतमोजणी २५ मार्च होणार आहे.

शेतकरी कामगार पक्ष व भाजप यामध्ये तिन्ही ग्रामपंचायतमध्ये निवडणुकीची लढत होत आहे. कर्नाळा ग्रामपंचायतसाठी ३७ अर्ज सदस्यपदासाठी आले. त्यातील ११ जणांनी माघार घेतली तर सरपंच पदासाठी ४ अर्ज आले त्यातील दोघांनी माघार घेतली. चिपळे ग्रामपंचायतसाठी ३५ अर्ज सदस्य पदासाठी आले, त्यातील १९ जणांनी माघार घेतली. १ अर्ज अवैध ठरला. तर सरपंच पदासाठी ३ अर्ज आले त्यातील एकाने माघार घेतली.

कुंडेवहाळ ग्रामपंचायतसाठी २५ अर्ज सदस्य पदासाठी आले त्यातील १० जणांनी माघार घेतली, १ अर्ज अवैध ठरला. तर सरपंच पदासाठी ५ अर्ज आले त्यातील एकाने माघार घेतली. चिपळे ग्रामपंचायतमधून [illegible] पाटील (शेकाप), [illegible] (भाजप), [illegible] (शेकाप), [illegible] (भाजप) [illegible] बिनविरोध निवडून आले आहेत. गत वेळच्या निवडणुकीत पनवेलच्या तीन ग्रामपंचायत निवडणुकीत [illegible] शेकाप तर भाजपने शिरकाव केला होता.

वंचित बहुजन आघाडीचा कल्याण लोकसभेचा उमेदवार ठरेना !

आनंदराज आंबेडकरांना कार्यकर्त्यांची गळ

कल्याण ›› लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने ३७ उमेदवारांची पहिली यादी सुद्धा जाहीर झाली. मात्र पहिल्या यादीत राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा समजला जाणारा कल्याण लोकसभेचा उमेदवार निश्चित झालेला नाही. कल्याणमधून आनंदराज आंबेडकर यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली आहे. मात्र आनंदराज हे लोकसभा निवडणूक लढविण्यास इच्छुक नसून त्यांनी नकार दर्शविल्याचेही समजते. मात्र कल्याणातून इच्छुकांची भाऊगर्दी वाढली असून, त्यामुळे सेवानिवृत्त अधिकारी, डॉक्टर अशी उच्चशिक्षितांची यादी आहे. त्यामुळे उमेदवार कोणाला द्यायचा? असा प्रश्न पडला आहे. त्यामुळे पहिल्या यादीत कल्याण लोकसभेचा उमेदवार ठरू शकलेला नाही.

बहुजन आघाडीत भारिप बहुजन महासंघ, रिपब्लिकन सेना आणि एमआयएम्या समावेश आहे. कल्याणात दलित बहुजन आणि मुस्लिमांच्या मतांची संख्या अधिक असल्याने रिपब्लिकन सेनेचे नेते आनंदराज आंबेडकर यांनीच ही जागा लढवावी अशी गळ कार्यकर्त्यांनी घातली आहे.

मात्र लोकसभा निवडणूक लढवण्यास नसल्याचे आनंदराज यांनी नकार दिल्याचेही त्या पदाधिकाऱ्याने सांगितले. कल्याणातून इच्छुकांची संख्या अधिक आहे. त्यामध्ये सरकारी सेवानिवृत्त अधिकारी काही सनदी अधिकारी तसेच डॉक्टर इंजिनियर आदींनी पक्षाकडे उमेदवारीसाठी इच्छा दर्शविली आहे. आनंदराज आंबेडकर यांनी मागणी आणि इच्छुकांची झालेली भाऊगर्दी यामुळे पहिल्या यादीत कल्याणचा उमेदवार ठरू शकलेला नाही.

काँग्रेसकडून जागा वाटपावर तोडगा न निघाल्याने अखेर वंचित बहुजन आघाडीने ४८ पैकी ३७ उमेदवारांची यादी भारिपचे अध्यक्ष व बंधआचे नेते ॲड प्रकाश आंबेडकर यांनी जाहीर केली. समाजातील वंचित घटकाला सामावून घेत प्रत्येक समाजाला उमेदवारी मिळावी असा आघाडीचा हेतू आहे. त्या दृष्टीकोनातून उमेदवारी जाहीर केली जात असल्याचे पक्षातील एका पदाधिकाऱ्याने सांगितले. वंचित [illegible] असेही खास सूत्रांनी सांगितले. येत्या दोन दिवसात कल्याणचा उमेदवार जाहीर होणार असल्याचेही त्या पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. सध्या कल्याण लोकसभेतून राष्ट्रवादी काँग्रेसने ठाण्याचे नगरसेवक बाबाजी पाटील यांना उमेदवारी जाहीर केली. तर शिवसेनेतून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे रिंगणात असणार आहेत. मनसेची भूमिका अद्यापही अस्पष्ट आहे.

साफसफाईचे काम बंद

मात्र कंत्राटदाराला कामाचे बिल

नवी मुंबई ›› प्रतिनिधी
connect@mymahanagar.com

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये उभारलेल्या अतिरिक्त भाजीपाला बाजार आवारामध्येही मालाची आवक जवळजवळ वर्षभरापासून बंद आहे. शिवाय येथे कृषीपूरक मालाचा व्यवसाय करण्यास परवानगी दिल्याने सध्या यांचकाम करून गाळे उभारण्याचे काम सुरू आहे. येथे काम सुरू असतानाही बाजार समितीच्या वतीने येथे साफसफाई करण्यासाठी दर महिन्याला लाखभर रुपये खर्च केले जात आहेत. येथे साफसफाईचे काम बंद असतानाही बाजार समितीने संबंधित कंत्राटदाराला साफसफाईची बिले दिली आहेत. बाजार बंद असताना साफसफाईची बिले पास करण्याच्या संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी बाजार समितीच्या कर्मचारी युनियनने बाजार समिती सचिवांकडे केली आहे.

मुंबई मुख्य भाजीपाला बाजारातील जागा अपुरी पडत असल्याने भाजीपाला बाजाराच्या आवाराजवळच नवीन अतिरिक्त भाजीपाला बाजाराचे उभारणी करण्यात आली असता गत वर्षभरापासून व्यापाऱ्यांनी सुरूवात असलेल्या गाळ्यांनी येथे यांधणी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे या बाजार आवारात सध्या फक्त बांधकाम सुरू आहेत. काही व्यापाऱ्यांनी गाळ्यांचा वापर गोदाम म्हणून सुरू ठेवला आहे. मात्र असे असतानाही या ठिकाणी साफसफाईसाठी दर महिन्याला लाखभर रुपये खर्च केले जात आहे.

महत्त्वाचे म्हणजे येथे आधीच बाजार नियमनमुक्त झाल्याने बाजार समितीचे उत्पन्न कमी झाले आहे, तेव्हा अशाप्रकारे बाजार समितीकडून होणारा पैशांचा अपव्यय थांबवावा, अशी मागणी युनियनने केली आहे. बाजार समितीच्या वतीने नुकतेच या मार्केटच्या साफसफाईची बिले कंत्राटदाराला अदा केली आहेत, त्या वेळेतील ही बिले अदा करण्यात आली आहेत, त्या वेळेत तर सफाईचे काम बंदच होते. या बाजार आवारात सफाईचे काम करण्यासाठी असलेले कामगार नेहमी अन्य बाजार आवारात काम करताना दिसतात, असा आरोपही सचिवांना देण्यात आलेल्या पत्रात करण्यात आला आहे.

पाली-खोपोली मार्ग धोकादायक अवस्थेत

पाली ›› वाकण ते खोपोली महामार्गावरील पालीपासून खोपोलीपर्यंतच्या मार्गावर जागोजाग खड्डे पडले असल्याने हा मार्ग कमालीचा धोकादायक बनला आहे. येथील मिनिडोअर स्टँड व आगरआळी जवळील रस्त्यावर मागील एक-दोन महिन्यांपासून मोठाले खड्डे पडले असल्याने अपघातांचे भय वाढले आहे.

अष्टविनायकांपैकी एक असलेल्या श्री बल्लाळेश्वराच्या पाली शहरात प्रवेश करतानाच या खड्ड्यांचा सामना प्रवाशांना करावा लागतो. या रस्त्याच्या खालून शहराला पाणी पुरवठा करणारी मोठी पाइपलाईन गेलेली आहे. ही लाईन अतिशय जीर्ण झाली असल्याने त्यावरून एखादे अवजड वाहन गेल्यानंतर ती फुटते व सर्व पाणी रस्त्यावर येऊन रस्त्याची अवस्था अधिकच बिकट होते. खड्डे चुकविण्याच्या नादात अनेकदा अपघात घडले असून, वाहनचालकांना वाहन चालविताना कमालीची कसरत करावी लागत आहे. रात्रीच्या वेळी या मार्गावरून वाहन नेणे ही अवघड कसरत ठरत असून, वाहनांच्या नुकसानीसोबत इंधनाची नासाडी होत आहे. दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग तर नकोसा झाला असल्याने बांधकाम खात्याविरोधात त्यांच्यातून नागरीचा सूर उमटत आहे. दरम्यान, या मार्गावरील खड्डे बुजवून, तसेच हाती घेतलेले रुंदीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते पी. सी. पालकर यांनी 'आपलं महानगर'शी बोलताना केली.

मेरी खाकी नही दुँगी

एसटीच्या महिला वाहकांचा नव्या गणवेशाला विरोध

पेण ›› महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अर्थात एसटीच्या सेवेत खाकी गणवेश धारण करून तिकीट वाटपाची कामगिरी करणाऱ्या महिला वाहकांना आता नवीन गणवेशाचे वाटप प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. हा नवीन गणवेश शाळकरी मुलींच्या गणवेशासारखा असून, ग्रामीण भागात असा गणवेश घालून वाहकाची कामगिरी करताना कुचंबेला सामोरे जावे लागत असल्याने या वाहकांनी या गणवेशाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

हे गणवेश योग्य मापाचे नसल्यामुळे तंग पँट, ढगळ कुडते अडकवून महिला वाहकांना बुजगावण्यासारखे वावरावे लागत आहे. हा गणवेश निश्चित करताना काही मोजक्याच कामगार प्रतिनिधींना बोलावून संमती घेण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात हा गणवेश धारण केल्यानंतर अवघडल्यासारखी परिस्थिती निर्माण होत असल्याची भावना या वाहक व्यक्त करीत आहेत.

पूर्वी महिला वाहकांना पोलिसांप्रमाणे खाकी रंगाचा गणवेश होता. या गणवेशामुळे त्यांना आदर, सन्मान मिळत होता. खाकी गणवेश धारण करून कामगिरी करणाऱ्या महिला वाहकांना सुरक्षित वाटत होते.

जनसामान्यात खाकी गणवेशाबद्दल निर्माण असलेला आदर या महिला भागांना प्राप्त होत होता. परंतु आता नवीन गणवेशाची प्रतवारी त्याचा रंग व ग्रामीण भागात असा पेहराव हा आत्मसन्मानाला बाधा निर्माण करणारा झाला आहे.

त्यामुळे या नवीन गणवेशाबाबत महिला वाहकांमध्ये प्रचंड नाराजी असून, 'मेरी खाकी नही दुँगी', अशी भूमिका वाहकांनी घेतली आहे.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील अनेक विभागातील महिला वाहकांनी नवीन गणवेशा ऐवजी पूर्वीचा खाकी गणवेशच द्यावा, अशी विनंती यापूर्वी करण्यात आलेली आहे.